THE

Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 26TH MARCH 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

## दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थीं दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं ह्यावरून खालीलप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहेः—

सरनामा व सुरुवात.

१. (१) ह्या आक्टास सन १८९६ चा दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा सुधारण्याकरितां आक्ट असें ह्मणावें, आणि

(२) तो तारीख १ माहे मार्च सन १८९६ रोजीं अमलांत येईल.

सन १८८२ चा आक्ट १४ वा, कलम १९५, ह्याची सुधारणा.

२. कलम १९९ ह्याच्या पहिल्या पारिग्राफाच्या बदला खालिल मजकूर दाखल करावा; तो येणेंप्रमाणेंः—

"१९९. कोणत्याही एकतर्फी दाव्यांत अगर बिनतक्रारी कामांत, आणि कोणत्याहि दाव्याच्या अगर इतर कामाच्या बाबतींत अर्ज करण्यांत आला असतां त्याप्रसंगीं, आफिडेव्हिटानें साक्ष देण्याचा अख्त्यार आहे, परंतु आफिडेव्हिट करणाऱ्या असामीचा उलट तपास होण्यासाठीं त्यानें हजीर रहावें ह्मणून हुकुम करण्याचा कोर्टास अख्त्यार आहे."

कलम २३५ ह्याची सुधारणा.

३. कलम २३९ ह्यांत, "अगर त्याची मिळकत जप्त करावी" ह्या शब्दांनंतर खालील शब्द दाखल करावेः—

"अगर त्याचीं मिळकत जप्त करून तिची विक्री करावी."

कलम २८९ ह्याच्या बदला नवीन कलम दाखल करणें.

४. कलम २८९ ह्याच्या बदला खालील कलम दाखल करावेंः—

"२८९. सदहू जाहिरनामा कलम २७४ यांत सांगितल्या रीतीनें प्रसिद्ध केला पाहिजे, आणि तो जप्तीच्या बरोबर प्रसिद्ध करावा ह्मणून हुकुमनामेवाला जेव्हां जेव्हां अर्ज करील तेव्हां तेव्हां तो तसा प्रसिद्ध केला पाहिजे. अशा जाहिरनाम्याची एक नकल, समन्स बजावण्याविषयींच्या ठरविलेल्या रीतीनें फैसल्यांतील रिणकोवर अगर त्यानें बजावणीच्या कामांत एकादा प्लीडर नेमिलेला असल्यास त्यावर बजाविली पाहिजे.

मिळकत शंभर रुपये व त्याहून जास्त किंमतीची असल्यास तिच्याबदलची जाहिरखबर, दरेक जिल्ह्याच्या अगर अनेक जिल्हे मिळून झालेल्या दरेक गटाच्या स्थानिक गझेटांत प्रसिद्ध करण्याविषयीं ठराव व कानू करण्याचा स्थानिक सरकारास अख़्त्यार आहे.

कोणत्याही जिल्ह्यासाठीं अगर जिल्ह्यांच्या कोणत्याही गटासाठीं सदरहू प्रकारचा ठराव व कानू करण्यांत आल्यानंतर, मिळकतीबद्दलची जाहिरखबर त्या जिल्ह्याच्या अगर गटाच्या स्थानिक गझेटांत प्रसिद्ध केली पाहिजे; आणि ह्या जाहिरखबरीचा खर्च विक्रीच्या खर्चाप्रमाणें गणला जाईल. परंतु असा ठराव व कानू करण्यांत येत तोंपर्यंत, मिळकतीबद्दलची जाहिरखबर स्थानिक सरकारी गझेटांत अगर एकाद्या स्थानिक वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्याविषयीं हुकुम करण्याचा कोर्टास अख्त्यार आहे; आणि अशा जाहिरखबरीस खर्च लागेल तो विक्रीच्या खर्चाप्रमाणें गणला जाईल."

कलम ६५३ ह्यानंतर एक नवीन बाब दाखल करणें.

९. कलम ६९३ ह्यानंतर खालील कलमें जास्त दाखल करावीं :—

"बाब ५०.

"पुरवणीचे ठराव.

विवक्षित दाव्यांच्या प्रसंगीं काम तहकूब करण्याविषयीं अर्ज.

"६९४. जो दावा करण्याकरितां, अमलांत असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वयें, पहिल्यानें नोटीस द्यावी लागते, अशा कोणत्याही दाव्याच्या प्रसंगीं प्रतिवादी जर नोटीस बजावण्यासंबंधानें अगर तिच्या कायदेशीरपणासंबंधानें प्रश्न उपस्थित करील, तर, प्रतिवादीला जितक्या मुदतीची नोटीस मिळण्याचा हक्क असेल, तितकी मुदत निदान त्याला मिळेल अशा वेळापर्यंत त्या दाव्याचें काम तहकूब करावें ह्मणून अर्ज करण्याचा वादीस अख्त्यार आहे.

काम तहकूब ठेवणें.

"६९५. असा अर्ज करण्यांत आला ह्मणजे, कोर्टानें, प्रतिवादीला जितक्या मुदतीची नोटीस मिळण्याचा हक्क असेल तितकी मुदत निदान त्याला मिळेल अशा वेळापर्यंत त्या दाव्याचें काम तहकूब ठेविलें पाहिजे.

"अशी मुदत संपली ह्मणजे, प्रतिवादीला, दाव्यास नवीन जबाब देणें अगर दावा कबूल करून दावा केलेली मिळकत अगर पैसा वादीच्या स्वाधीन करण्याकरितां कोर्टाकडे देणें ह्यांपैकीं कोणतीही एक गोष्ट करण्याविषयीं निश्चय करण्याचा अख्त्यार आहे.

अशा दाव्यांतला खर्च.

"६९६. प्रतिवादीनें जर दावा कबूल करून दावा केलेली मिळकत अगर पैसा कोर्टाकडे दिला, तर, कोर्टानें त्याकडून कोणताही खर्च देववू नये.

"प्रतिवादीनें जबाब देण्याचें पत्कारिलें तर, कोर्टानें, त्या दाव्यांत, नोटिशीची बजावणी अगर तिचा कायदेशीरपणा ह्यांच्या संबंधाचा अगर त्यांवर अवलंबून असणारा असा कोणताही प्रश्न उपस्थित करूं न देतां, पक्षकारांच्या दरम्यान इतर मुद्दे निघालेले असल्यास त्यांचा निकाल केला पाहिजे. कोर्टानें वादीच्या तर्फे निकाल केला तर, त्या प्रकरणाच्या हकीकतीवरून न्याय्य दिसेल त्या दिवसापासून आपला हुकुमनामा अमलांत यावा असें त्या कोर्टानें ठरविलें पाहिजे."

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

ह्या मसुद्याच्या द्वारें, दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्यांत ज्या सुधारणा करण्याचें योजिलेलें आहे, त्या सुधारणा योग्य आहेत एवढेंच केवळ नव्हे, पण त्यांतल्या कांहीं फारच आवश्यक दिसतात.

१. पहिली सुधारणा कलम १९९ ह्यांत करावयाची आहे. ह्या कलमाअन्वयें, अर्ज करण्यांत आले असतां, आफिडेव्हिटानें साक्ष देतां येते. योजिलेल्या सुधारणेच्या योगानें, कोर्टास, एकतर्फी दाव्यांमध्यें आणि बिनतक्रारी कामांमध्यें आफिडेव्हिटानें साक्ष घेतां येईल. हे कोर्टांत, प्रोबेट अगर वहिवाटीची सनद देण्याच्या संबंधानें चाललेल्या बिनतक्रारी कामांत आफिडेव्हिटानें साक्ष घेण्यांत येते. आफिडेव्हिट करणाऱ्या असामीचा उलट तपास होण्यासाठीं

त्याला हजर राहाण्यास हुकुम करण्याचें हरएक प्रसंगीं कोर्टाच्या मर्जीवर ठेवून सर्व एकतर्फी दाव्यांमध्यें व विनतक्रारी कामांमध्यें आफिडेव्हिटानें साक्ष कां देऊं नये यास कांहीं कारण दिसत नाहीं.

२. पुढच्या दोन्ही सुधारणांबद्दल एकत्र विचार केला असतां चालेल. बंगाल टेनन्सी आक्ट ह्याच्या १६३ व्या कलमांत, जप्तीची प्रोसेस व जाहीरनामा हीं दोन्ही एकाच वेळीं काढण्याबद्दल जसा ठराव आहे तसा ठराव दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्यांत सांप्रत नाहीं. योजिलेल्या सुधारणांच्या योगानें, हुकुमनामेवाल्यास, रिणकोची मिळकत जप्त करून तिची विक्री करण्याविषयीं आणि त्यांबद्दल एकाच वेळेस प्रोसेस काढण्याविषयीं अर्ज करतां येईल आणि त्याच्या योगानें, प्रोसेसी निरनिराळ्या वेळीं बजावल्यामुळें होणारा खर्च व विलंब टाळतां येईल.

पुढचा ठराव, फैसल्यांतील रिणकोवर जाहिरनामा बजावण्याविषयीं आहे. मिळकतीवर जाहिरनामा लाविला असतां तो फैसल्यांतील रिणकोस पुरेशा नोटिशीदाखल होय असा दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा तयार करणाऱ्यांचा बहुशः अभिप्राय होता. परंतु, अशा रीतीनें जाहिरनामा बजाविल्यानें त्याविषयीं पुष्कळ प्रसंगीं संशय उत्पन्न होऊन वाद उपस्थित होतो; आणि जाहिरनाम्याची बजावणी सदहू प्रमाणें इमानानें केलेली असली तरी, तेवढ्यावरून, फैसल्यांतील रिणको जवळपास राहात नसला तर त्याला मिळकतीची विक्री होणार हें समजत नाहीं. सन १८९४ चा दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा सुधारण्याबाबद आक्ट ह्याअन्वयें फैसल्यांतील रिणकोला, हुकुमनाम्याची रकम आणि खरेदीदारास नुकसानीचा मोबदला ह्मणून देण्याकरितां ९ टक्के इतकी रकम अनामत ठेवून विक्रीच्या तारिखेपासून तीस दिवसांच्या आंत ती विक्री रद्द करण्याची तजवीज करतां यावी यासाठीं त्याला त्या विक्रीची नोटीस मिळणें अवश्यक आहे.

जिल्ह्याच्या भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या आणि दिवाणी कोर्टांच्या अगर मुलकी अधिकाऱ्यांच्या हुकुमावरून होणारे जमिनींचे सर्व जाहीर लिलांव ज्यांत जाहिरखबरींच्या योगानें प्रसिद्ध करण्यांत येतात अशा स्थानिक गॅझेटांत मिळकतीबद्दल जाहीरखबर देण्याविषयीं ठराव व कानू करण्याचा अधिकार, सुधारलेल्या २८९ व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफाअन्वयें स्थानिक सरकारास दिलेला आहे. दवंडी पिटवून जाहिरनामा प्रसिद्ध करण्याची जुनी वहिवाट फारच अपुरती आहे आणि ह्मणून, त्या वहिवाटीशिवाय, जमीन खरेदी करणाऱ्या लोकांस पाहिजे तेव्हां पाहायास मिळेल अशा एकाद्या स्थानिक गॅझेटांत जाहिरखबर प्रसिद्ध करण्याची पद्धत सुरू करणें आवश्यक आहे.

३. दाव्याच्या आधीं नोटीस देण्याचा नियम ह्या देशाच्या स्थितीस अगदीं अनुसरून नाहीं असें दिसतें; कारण ह्या देशांत ह्या नियमाची प्रवृत्ति स्पष्टपणें अपायकारक असून न्यायाच्या कामीं अतिशयित विघ्न आणणारी आहे. त्यानियमाच्या योगानें पक्षकारांच्या दरम्यान प्रथमारंभीं एक कृत्रिम मुद्दा उपस्थित होऊन खरे मुद्दे एकीकडे राहातात. ह्या नियमाअन्वयें दावे काढून टाकण्यांत येतात तें पाहिलें ह्मणजे वाईट वाटतें. योजिलेल्या पुरवणीच्या ठरावांच्या योगानें, ह्या नियमाची सक्ती नाहींशी होऊन आणि हल्लींच्या नियमाप्रमाणें प्रतिवादीस मिळणारा प्रत्येक फायदा त्यास मिळून, दाव्यांच्या गुणदोषांकडे न पाहतां हल्लींप्रमाणें ते काढून टाकितां येणार नाहींत. आतां कोर्ट प्रतिवादीस असें ह्मणेल कीं, "तुह्मांस सहा महिन्यांची नोटीस मिळण्याचा हक्क असून तशी नोटीस तुह्मांस देण्यांत आली नाहीं असें तुमचें ह्मणणें आहे काय? बरें तर, तुमच्यासाठीं आह्मी हा दावा सहा महिनेपर्यंत तहकूब ठेवितों. ह्या सगळ्या वेळपर्यंत मिळकत तुमच्या स्वाधीन राहील, आणि जबाब देणें वाजवी आहे असें तुह्मांस वाटत असल्यास त्या जबाबाचा विचार करण्यास आणि तो परिपक्क करण्यास हा इतका वेळ तुह्मांस मिळेल. तुह्मांकडे चांगलासा जबाब नसल्यास तुह्मांला दावा कबूल करून, मिळकत वादीच्या स्वाधीन करण्यासाठीं कोर्टाकडे देतां येईल, आणि मग तुह्मांला खर्च द्यावा लागणार नाहीं. सारांश, दावा सुनावणीशिवाय काढून टाकणें आणि नोटिशीच्या मुद्यावर वाद उपस्थित करून साक्षीदार आणून भांडत बसणें ह्या गोष्टींशिवाय, तुमचें जें कांहीं वाजवी ह्मणणें असेल, तें सर्व कांहीं तुह्मांस मिळेल."

तारीख ९ माहे जानेवारी सन १८९६.

(सही) मो. मो. बॅग.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

---

## लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

---

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १० माहे जानेवारी सन १८९६ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यांसाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

## सन १८९६ चा आक्ट १ ला.

### सन १८८३ चा हिंदुस्थानचा देशनिर्गमनाविषयींचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट.

ज्याअर्थीं सन १८८३ चा हिंदुस्थानचा देशनिर्गमनाविषयीं आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून येणेंप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

सन १८८३ चा आक्ट २१, याच्या १०५ व्या कलमाची सुधारणा.

१. सदरहू आक्टाचें कलम १०५, पोट-कलम (१), यांत "कराराअन्वयें" या शब्दाबदल "कबुलायतीअन्वयें किंवा तशी कबुलायत करण्याच्या हेतूनें" हे शब्द दाखल केले पाहिजेत.

सन १८८३ चा आक्ट २१, याच्या १०५ व्या कलमानंतर नवीन कलम जास्त दाखल करणें.

२. सदरहू आक्टाच्या १०५ व्या कलमानंतर खालील कलम ज्यास्त दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :—

मलिका माआझमांच्या सरकाराकरितां समुद्रापलीकडील कोणत्याहि देशांत मुशारा घेऊन मजुरी करण्यास कबूल असलेल्या हिंदुस्थानच्या देशी मनुष्यांस आक्ट व कानू सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं नालागू ठरविण्याचा अधिकार.

"१०६. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस इंडिया गझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून ह्या आक्टाचे किंवा त्याखालील कानूंचे सर्व किंवा कोणतेही ठराव, समुद्रापलीकडील कोणत्याही देशांत मुशारा घेऊन मजुरी करण्याविषयीं मलिका माआझमांच्या सरकाराशीं किंवा त्याच्या वतीनें केलेल्या कबुलायतीअन्वयें ब्रिटिश इंडियांतून जाणाऱ्या हिंदुस्थानच्या देशी मनुष्यांच्या बाबतींत लागू नाहींत असें, किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस योग्य दिसतील तशा शर्तींस, फेरफारांस व इयत्तांस पात्र राहून लागू होतील असें वेळोवेळीं ठरवितां येईल :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ब्रिटिश इंडियांतून याप्रमाणें जाणाऱ्या हिंदुस्थानच्या देशी मनुष्यांस योग्य रीतीनें वागविण्याविषयीं, कानूंच्या योगें किंवा इतर रीतीनें, योग्य बंदोबस्त केला असल्याबद्दल गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची प्रथम खातरी झाल्यावांचून ह्या कलमाअन्वयें जाहिरनामा काढतां कामा नये."

एस्. हार्व्हे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.